# अंदाज समिती

(२०२५-२०२६)

(पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

सत्यमेव जयते

(विधि व न्याय विभागाकडील बांधकाम कामनिहाय
तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्यास
मान्यता मिळण्याबाबतच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल)

## पहिला अहवाल

(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस
दिनांक२५फेब्रुवारी, २०२६ रोजी सादर करण्यात आला.)

*

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
फेब्रुवारी, २०२६

# अंदाज समिती

## (२०२५-२०२६)

## (पंधरावी महाराष्ट्र विधानसभा)

**(विधि व न्याय विभागाकडील बांधकाम कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्यास मान्यता मिळण्याबाबतच्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल)**

# पहिला अहवाल

**(सदर अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
फेब्रुवारी, २०२६

एचबी २१७०—१

# अंदाज समिती
## (२०२५-२०२६)

**समिती प्रमुख**

१) **श्री. अर्जुन खोतकर, वि.स.स.**

**सदस्य**

२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.

३) श्री. चैनसुख संचेती, वि.स.स.

४) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

५) श्री. कृष्णा खोपडे, वि.स.स.

६) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

७) श्री. बबनराव लोणीकर, वि.स.स.

८) श्री. दिलीप बोरसे, वि.स.स.

९) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

१०) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

११) श्री. प्रवीण दटके, वि.स.स.

१२) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स.

१३) श्री. बालाजी कल्याणकर, वि.स.स.

१४) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

१५) श्री. किरण सामंत, वि.स.स.

१६) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

१७) श्री. शेखर निकम, वि.स.स.

१८) श्रीमती सरोज अहिरे, वि.स.स.

१९) डॉ. राहूल पाटील, वि.स.स.

२०) श्री. कैलास पाटील, वि.स.स.

२१) श्री. नाना पटोले, वि.स.स.

२२) श्री. रोहित पाटील, वि.स.स.

२३) रिक्त

२४) श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.

२५) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

२६) श्री. हेमंत पाटील, वि.प.स.

२७) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

२८) श्री. राजेश राठोड, वि.प.स.

२९) श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ. विलास आठवले, सचिव-३

२) श्री. राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी

३) श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव

४) श्री. सुरेश उपासकर, कक्ष अधिकारी.

## अनुक्रमणिका



| अ. क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ क्र. (३) |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना .. | (सात) |
| २) | अहवाल .. | १ |
| ३) | समितीचे अभिप्राय व शिफारशी .. | ३ |
| ४) | परिशिष्ट - एक .. ("विधि व न्याय विभागाकडील बांधकाम कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्याबाबत अंदाज समितीची मान्यता मिळण्याबाबत विधि व न्याय विभागाची माहिती.) | ५ |
| | परिशिष्ट - दोन (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त) | ९ |

## प्रस्तावना

मी, अंदाज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून सन २०२६-२०२७ आर्थिक वर्षापासून "विधि व न्याय विभागाकडील बांधकाम कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्याबाबत" अंदाज समितीची मान्यता मिळण्याकरिता विधि व न्याय विभागाने पाठविलेल्या प्रस्तावासंदर्भातील अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा असतो तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात येईल अशी नियमात तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम २०९ (क) अनुसार समितीकडे विचारार्थ आलेल्या वित्तीय प्रश्नावर सरकारला सल्ला देणे ही एक महत्त्वपूर्ण जबाबदारी अंदाज समितीकडे सोपविण्यात आलेली आहे. यापूर्वीही शासनाने अशा प्रकारच्या वित्तीय बाबी समितीकडे विचारार्थ पाठविल्या होत्या. यावरील अहवाल समितीने त्या त्या वेळी सभागृहास सादर केलेले आहेत.

सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षापासून "विधि व न्याय विभागाकडील बांधकाम कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्याबाबत" अंदाज समितीची मान्यता आवश्यक असल्याने विधि व न्याय विभागाने समितीकडे सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविला आहे.

विधि व न्याय विभागाने अंदाज समितीकडे पाठविलेल्या उपरोक्त नवीन परिशिष्टाच्या प्रस्तावासंदर्भात प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांची साक्ष घेतली. सदर प्रस्तावास समितीने मान्यता दर्शविली आहे.

समितीसमोर प्रत्यक्ष उपस्थित राहून साक्ष दिल्याबद्दल श्री. दिलीप घुमरे, प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांची समिती अत्यंत आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या वेळी आपला अमुल्य वेळ देऊन समिती सदस्यांनी ज्या आस्थेने व तत्परतेने हे काम पूर्ण करण्यास सहकार्य दिले त्याबद्दल मी त्यांचे मनःपुर्वक आभार मानतो.

समितीने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर चर्चा केली व अहवाल संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६.

**अर्जुन खोतकर,**
समिती प्रमुख,
अंदाज समिती.

## अहवाल

अंदाज समिती ही महाराष्ट्र विधानमंडळाची एक अत्यंत महत्त्वाची वित्तीय समिती आहे. अर्थसंकल्पीय अंदाज आणि पूरक अनुदानासाठीच्या मागण्यांची छाननी करण्यासाठी आणि असे अंदाज व मागण्या ज्या धोरणावर आधारित असतील त्या धोरणाशी सुसंगत असे काटकसरीचे उपाय सुचविण्यासाठी आणि अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा तो नमुना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा असतो तो नमूना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात येईल अशी नियमात तरतूद आहे. Estimate Committee is authorized committee to suggest format of the budget. तसेच महाराष्ट्र विधानसभा नियम २०९ (१) (क) अन्वये अंदाज समितीकडे विचारार्थ पाठविण्यात येतील अशा वित्तीय प्रश्नांवर सरकारला सल्ला देणे अशीही तरतूद केलेली आहे. कौल आणि शकधर यांच्या **PRACTICE AND PROCEDURE OF PARLIAMENT** या पुस्तिकेच्या सातवी आवृत्तीमधील पृष्ठ क्र. ९२० वरील अंदाज समितीच्या कार्यपद्धतीमध्ये **Whenever Government want to make any change in the format or the information to be given in the Budget papers on Demands for Grants, the matter is referred to the Committee for their recommendations** असे नमूद करण्यात आले आहे. उपरोक्त नमुद महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ (१) च्या तरतुदीच्या अनुषंगाने विधि व न्याय विभागाने दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये अर्थसंकल्प अंदाज भाग-२ या अर्थसंकल्प प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नविन परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीची मान्यता मिळण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला.

वित्त विभागाच्या दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विधीमंडळामध्ये तसेच लोकलेखा समितीच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीतील चर्चेच्यावेळी विशिष्ट योजनांना जो निधी एकत्रितरित्या दाखविला जातो, अशा योजनांवरील निधीची विभागणी कशी होते, तो कोणाकोणाला दिला जातो याबाबतची निश्चित अशी माहिती प्राप्त होत नसल्याने एकत्रित निधीची विभागणी देणेबाबत वेळोवेळी आग्रह धरण्यात येतो. उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने वित्त विभाग परिपत्रक दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ अन्वये तसेच नियोजन विभागाच्या दिनांक ११ जून, २०१८ च्या परिपत्रकान्वये निधी अर्थसंकल्पीत करताना कामनिहाय तरतुदी दर्शविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, विभागाच्या भाग-३ "विधि व न्याय कार्यालयीन इमारतींचे बांधकाम करणे व न्यायालयांना पायाभूत सुविधा पुरविणे" ही नवीन सुधारित राज्य योजना दिनांक ०७ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली. त्यासाठी नवीन लेखाशीर्ष निर्माण करणे आवश्यक आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२ यामध्ये केलेल्या तरतुदीची जिल्हानिहाय वर्गवारी किंवा बांधकाम / कामनिहाय वर्गवारी याची माहिती अर्थसंकल्पीय अंदाज भाग -३ या परिशिष्टाद्वारे विधानमंडळास सादर करण्यात येते. त्यानुषंगाने आपल्या विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२ या अर्थसंकल्पीय प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय विगतवारी (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे वेगळ्याने दर्शविणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र विधानसभा नियम क्रमांक २०८ अन्वये अर्थसंकल्प ज्या नमुन्यात विधानमंडळास सादर करावयाचा आहे, तो नमुना सूचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणी क्रमांक एच-८ अंतर्गत अर्थसंकल्पीत केलेला नियतव्यय विधि व न्याय विभागाच्या मागणी क्रमांक "जे-४" अंतर्गत पावसाळी अधिवेशनात निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यामुळे विभागाकडील बांधकामनिहाय तरतुदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या स्वतंत्र परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीची तातडीने मान्यता घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२ यामध्ये केलेल्या तरतुदीची जिल्हानिहाय वर्गवारी किंवा बांधकाम / कामनिहाय वर्गवारी याची माहिती अर्थसंकल्पीय अंदाज भाग -३ या परिशिष्टाद्वारे विधानमंडळास सादर करण्यात येते. त्यानुषंगाने या विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाज भाग-२ या अर्थसंकल्पीय प्रकाशनात एकत्रितरित्या केलेल्या तरतुदीची बांधकामनिहाय (तरतूद व खर्च यासह) अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ या परिशिष्टाद्वारे वेगळ्याने दर्शविण्याबाबत वित्त विभागाने दिनांक १४ जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये विधि व न्याय विभागास कळविले आहे. त्यानुषंगाने विधि व न्याय विभागाच्या कामनिहाय तरतुदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या स्वतंत्र परिशिष्टाद्वारे दर्शविण्यासाठी अंदाज समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने अंदाज समितीने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी विधि व न्याय विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी दिलेली माहिती खालील प्रमाणे आहे.**

विधि व न्याय विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने विधि व न्याय विभागाच्या सचिवांना विधि व न्याय विभागाकडील बांधकामाच्या कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टामध्ये दर्शविण्याबाबत सविस्तर माहिती देण्याबाबत सूचित केले असता, विभागाच्या सचिवांनी सदरहू प्रस्तावाबाबत पार्श्वभूमी विदित करताना सांगितले की, पायाभूत सुविधा संबंधित जो निधी विधि व न्याय विभागाला मिळत होता तो सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखाशीर्षाखाली जमा होत होता. सदरचा निधी हा विधि व न्याय विभागाचा नियतव्यय असायचा. सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावाने अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये सदरचा निधी दिसत होता. सदर निधी हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखाशीर्षाखाली दिसत असल्यामुळे विधि व न्याय विभागासाठी खर्च होणारा निधी उक्त विभागाच्या लेखाशिर्षावर दिसत नव्हता त्यामुळे विधि व न्याय विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद कमी दिसत होती.

उपरोक्त नमूद महोदयांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने न्यायालयीन इमारती व न्यायाधीश निवासस्थाने यांच्या बांधकामांवर व्यवस्थितपणे नियंत्रण ठेवणे, त्याचे नीटपणे व्यवस्थापन करणे. जी बांधकामे पूर्णत्वास आली त्यांना जास्तीच्या निधीचे वाटप करुन ती पूर्ण करुन घेणे व जी बांधकामे सुरुवातीच्या स्तरावर आहेत त्यांना थोडा कमी निधी देणे, या सर्व बाबींचे नियोजन करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणी क्रमांक एच-८ चा निधी विधि व न्याय विभागाच्या मागणी क्रमांक "जे-४" कडे घेत आहोत. निधी वाटप करणे व त्याचे नियोजन करणे यावर विधि व न्याय विभागाचे नियंत्रण असावे असे विभागाला वाटते. सदरच्या बाबी पूर्ण होण्यासाठी प्रस्तावित कार्यवाही करण्यात येत आहे. यात विधि व न्याय विभागाकडील बांधकामावर नियंत्रण असणे व त्याच विभागाकडून निधीचे वाटप व्यवस्थित होणे ही मुख्यतः कामे आहेत.

राज्यातील विविध न्यायालयाच्या इमारती व न्यायाधीशांची निवासस्थाने यांची बांधकामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होतात. त्यासाठी केंद्र शासनाकडून ६० टक्के निधी तर राज्य शासनाकडून ४० टक्के निधी देण्यात येतो. सदरची योजना १९९३ पासून सुरु असून केंद्र शासन जेवढा निधी देतो, त्याच्या ४० टक्के निधी राज्य शासनाला त्या योजनेसाठी देता येतो. त्यापेक्षा जास्त निधी त्या योजनेतून राज्य शासनाला देता येत नाही. मागील पाच वर्षात राज्य शासनाकडून ३०० ते ४०० कोटी रुपये या कामासाठी प्राप्त झाले असून त्यामधून न्यायालयीन कामकाजासंदर्भातील पायाभूत सुविधा विकसीत करण्यात आल्या आहेत.

त्याचप्रमाणे विधि व न्याय विभागांतर्गत "न्यायालयांना पायाभूत सुविधा पुरविणे" ही नवीन योजना राज्य शासनाने सुरु केली असून उक्त योजनेच्या निधी वितरणाचे प्रमाण केंद्र व राज्य शासनाकडून अनुक्रमे ६०/४० याप्रमाणे उपलब्ध होईल आणि आवश्यकतेप्रमाणे उक्त निधीचे वितरण व खर्च या प्राप्त झालेल्या निधीतून प्रस्तावित वा मान्य केलेल्या बांधकामावर खर्च करण्यात येईल.

या संदर्भात मा.समिती प्रमुखांनी मा.न्यायालयाच्या कामामध्ये आणखी वाढ होईल किंवा कसे तसेच यासाठी वेगळी अथवा पर्यायी यंत्रणा उभी करावी लागणार आहे काय ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी या संदर्भात असे स्पष्टीकरण दिले की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणी क्रमांक एच-८ अंतर्गत हा निधी दिसत होता. ज्यावेळी निधीचे वितरण होते तेव्हा ते विधि व न्याय विभागाकडे येत होते. विधि व न्याय विभाग ठरवित होते की, कोणत्या कामांना किती निधी दिला जावा. त्याची एक यादी तयार करण्यात येत होती. त्या यादीसह हा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या खात्यावर जात होता. कोणत्या कामांना किती निधी द्यायचा हे सार्वजनिक बांधकाम विभाग ठरवित नव्हते. तो निधी फक्त कार्यकारी अभियंता यांच्या खात्यावर हस्तांतरण करण्यात येत होता. त्याऐवजी आता सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या खात्यावर निधी हस्तांतरण करणार आहोत. त्यामुळे यासाठी वेगळी यंत्रणा उभी करावी लागणार नाही. पूर्वी देखील हा निधी विभागाकडे येत होता. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांकडे हा निधी जात होता तो आता थेट कार्यकारी अभियंता यांच्याकडे वर्ग होणार आहे. समितीने पुन्हा अशी पृच्छा केली की, अंमलबजावणी यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभागच राहणार आहे. यासाठी वेगळे परिशिष्ट निर्माण करण्याची गरज का भासली ? त्यावर विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की विधि व न्याय विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये एक टक्का निधी दिसायला पाहिजे यासाठी परिशिष्ट निर्माण करावे लागले. पायाभूत सुविधासाठी जास्तीत जास्त निधी तेथेच मिळतो. हा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखाशीर्षाकडे जात होता. त्यामुळे विधि व न्याय विभागाची अर्थसंकल्पीय तरतूद अतिशय नगण्य दिसत होती. यासाठी या दोन योजना वेगवेगळ्या ठेवण्यात आल्या आहेत.

*************

## अभिप्राय शिफारशी

आर्थिक वर्ष सन २०२६-२०२७ मधील विधि व न्याय विभागाकडील बांधकामाच्या कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्यासाठी अंदाज समितीची मान्यता मिळण्याबाबत विधि व न्याय विभागाचे क्र.बीयुडी/१४२४/प्र.क्र.७५/का.१३, दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र विधानमंडळास विधि व न्याय विभागामार्फत कळविण्यात आले. उक्त पत्राच्या अनुषंगाने अंदाज समितीने विधि व न्याय विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी घेतली. यावेळी विभागीय सचिवांनी त्यांच्या उपरोक्त नमूद दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने "निधी अर्थसंकल्पित करताना कामनिहाय तरतुदी दर्शविण्याबाबतचे" शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण -२०१३/प्र.क्र.१०१/अर्थसं-२, दिनांकित २१ ऑगस्ट, २०१३ तसेच नियोजन विभागाच्या "सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करावयाच्या प्रस्तांवांची वित्तीय मर्यादा वाढविण्याबाबत" शासन परिपत्रक क्र. ससमा २०१०/प्र.क्र.४८ (भाग-१) का-१४६१, दिनांकित ११ जून, २०१८ संदर्भीत केले.

उक्त पत्रात विधि व न्याय विभागाच्या बांधकामाच्या तरतुदी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील लेखाशिर्षाअंतर्गत होत असल्याने त्याबाबतच्या कामनिहाय तरतुदी सद्यःस्थितीत अर्थसंकल्पामधील भाग-३ मधील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या परिशिष्टामध्ये येत असून सदरच्या तरतुदी आता विधि व न्याय विभागाच्या नवीन लेखाशिर्षाअंतर्गत करण्यास मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मान्यता प्रदान केली असून सदर मान्यतेच्या अनुषंगाने विधि व न्याय विभागाच्या बांधकामाच्या तरतुदी माहे जून, २०२५ च्या (पावसाळी) अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीद्वारे विधि व न्याय विभागाच्या लेखाशिर्षांखाली करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात बांधकामाच्या कामनिहाय तरतुदी विधि व न्याय विभागांतर्गत स्वतंत्र परिशिष्ट निर्माण करून त्यांतर्गत दर्शविणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विधानसभा नियम क्रमांक २०८ अन्वये अर्थसंकल्प ज्या नमून्यात विधानमंडळास सादर करावयाचा आहे, तो नमूना सुचविण्यासाठी अंदाज समितीची स्थापना करण्यात आली असून आता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये दर्शविण्याकरिता विधि व न्याय विभागांतर्गत स्वतंत्र परिशिष्ट निर्माण करण्यास अंदाज समितीची मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले.

समितीने विधि व न्याय विभागाच्या उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीनुसार यापूर्वी पायाभूत सुविधांसंदर्भाशी निगडीत केंद्र व राज्य शासनाकडून जो निधी मिळत होता, तो सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखाशिर्षाखाली जमा होत होता. सदरचा निधी हा विधि व न्याय विभागाचा नियतव्यय असायचा. सदरचा निधी विधि व न्याय विभागाचा असला तरी तो सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अर्थसंकल्पीय पुस्तिकेमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागासारखा असल्याचा दिसत होता. तथापि, प्रत्यक्षात सदरचा निधी हा विधि व न्याय विभागाच्या न्यायालयीन पायाभूत सुविधांकरिता अर्थसंकल्पीत केलेला असायचा.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी न्यायालयीन इमारती व न्यायालयीन निवासस्थाने यासाठी अर्थसंकल्पात नियतव्यय करणे, निधीचे संनियंत्रण करणे. निधी वाटप करणे, तसेच केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या ६० टक्के व राज्य शासनाकडून मिळणऱ्या ४० टक्के निधीचे वाटप इत्त्यादी बाबींचे नियोजन करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणी क्र. एच-८ चा निधी विधि व न्याय विभागाच्या मागणी क्र. जे-४ कडे घेण्याचा निर्णय झाला आहे, असेही विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले.

विभागीय सचिवांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे विधि व न्याय विभागाचा नियतव्यय वर्ग होत असल्यामुळे विधि व न्याय विभागास उक्त निधीवर कुठल्याही प्रकारचे नियंत्रण राहत नाही, त्यामुळे जो निधी ज्या विभागाचा आहे तो त्याच विभागाकडे वर्ग होणे आवश्यक असून अर्थसंकल्पात तरतूद केलेला निधी हा लेखाशिर्षाद्वारे दर्शविण्याची बाब **मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मान्य केली असल्यामुळे माहे जून, २०२५ च्या पावसाळी अधिवेशनापासून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणी क्र. "एच-८" अंतर्गत अर्थसंकल्पीत केलेला नियतव्यय विधि व न्याय विभागाच्या मागणी क्र. "जे-४" अंतर्गत अर्थसंकल्पीत करण्यात आल्यामुळे विधि व न्याय विभागाकडील बांधकामनिहाय तरतुदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ च्या नवीन परिशिष्टाद्वारे दर्शविण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम २०८ मधील नमूद तरतुदीनुसार अंदाज समितीच्या मान्यतेची आवश्यकता असल्याने विभागीय सचिवांनी साक्षीच्यावेळी अर्थसंकल्प ज्या नमून्यात विधानमंडळास सादर करावयाचा त्या नमून्यास अंदाज समितीने दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली आहे. विभागाने केलेली विनंती अंदाज समितीने मान्य केली असल्यामुळे सन २०२६-२७चे आर्थिक वर्षापासून विधि व न्याय विभागाकडील बांधकामनिहाय तरतुदीची विगतवारी अर्थसंकल्पीय अंदाज भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्ट देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती यथाशिघ्र समितीस अवगत करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

*************

## परिशिष्ट - एक
## (विधि व न्याय विभागाकडून प्राप्त झालेली माहिती)

(शा.म.मु) एचबी २९७०—३ (७५—२-२०२६)

महाराष्ट्र शासन

# CIVIL BUDGET ESTIMATE

# अर्थसंकल्पीय अंदाज

# 2026-27

# २०२६-२७

## PART III – APPENDICES

## भाग तीन — परिशिष्टे

### APPENDIX "I"

### परिशिष्ट "आय"

**DETAILS OF VARIOUS PROVISIONS FOR "WORKS" INCLUDED IN THE BUDGET ESTIMATE UNDER THE LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

**विधि व न्याय विभागाच्या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या "बांधकामा" संबंधिच्या निरनिराळया तरतुदींचा तपशील**

***Presented to the Legislature under Article 202(1) of the constitution of india***

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०२(१) अन्वये विधानमंडळास सादर**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
२०२६

रु. हजारात (Rs in Thousand

| अ.क्र. Sr. No. | प्रधान शीर्ष, गौणशीर्ष, उपशीर्ष, तपशीलवार शीर्ष व बांधकामाचे नाव | अंदाजित किंमत Estimated Cost | मार्च, २०१९ पर्यंत झालेला खर्च Expenditure upto March 2019 | अर्थसंकल्पीय अंदाज २०१९-२० Budget Estimates 2019-20 | उर्वरित किंमत Remaining Cost | सन २०२०-२१ साठी तरतूद Budget Estimates 2020-21 | Major Head, Minor Head, Detailed Head, and Name of the work |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |

# परिशिष्ट - दोन
## (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

**पहिली बैठक**
**बुधवार, दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६.**
**स्थळ :- विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख**

१) श्री.अर्जुन खोतकर, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स.

३) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

४) श्री. प्रविण दटके, वि.स.स.

५) श्रीमती नमिता मुंदडा, वि.स.स.

६) श्री.नाना पटोले, वि.स.स.

७) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ. विलास आठवले, सचिव-३,

२) श्री. राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी

३) श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव

**मंत्रालयीन अधिकारी**

(१) श्री. दिलीप घुमरे, प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग

(२) श्री. विलास गायकवाड, सह सचिव, विधि व न्याय विभाग

"विधि व न्याय विभागाकडील बांधकाम कामनिहाय तरतुदी अर्थसंकल्प भाग-३ मध्ये स्वतंत्र परिशिष्टान्वये दर्शविण्याबाबत" विधि व न्याय विभागाच्या विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. (साक्ष पूर्ण)

**दुसरी बैठक**
**मंगळवार, दिनांक १७ फेब्रुवारी, २०२६.**
**स्थळ :- विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती :**

**समिती प्रमुख**

१) श्री.अर्जुन खोतकर, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.

३) श्री.कृष्णा खोपडे, वि.स.स.

४) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

५) श्री.प्रविण दटके, वि.स.स.

६) श्री.दिलीपराव बनकर, वि.स.स.

७) श्री.कैलास पाटील, वि.स.स.

८) श्री.सुनिल शिंदे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ. विलास आठवले, सचिव-३,

२) श्री. राजेश तारवी, सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी

३) श्रीमती सीमा तांबे, अवर सचिव

समितीने प्रारुप अहवालावर चर्चा करून अहवाल संमत केला.